# प्रशालेच्या भविष्यकालीन गरजा / योजना

- वाढती विद्यार्थी संख्या, बहिस्थ स्पर्धा परीक्षा, ऐच्छिक विषय, विषय कक्ष यासाठी २० खोल्यांची नवीन इमारत बांधण्याचा संकल्प
- ज्युनियर कॉलेज, गुरुकुल, ग्रंथालयाचा विस्तार करणे.
- प्रयोगशाळा सुसज्ज व अद्ययावत करणे.
- रंजनमंदिर सर्व सोईंनी परिपूर्ण करणे.
- डिजीटल रुम्सची निर्मिती करणे.
- सर्व वर्गात ई-लर्निंगची सुविधा पुरविणे.
- अत्याधुनिक आय.टी. लॅबची स्थापना करणे.
- ॲम्पिथिएटर निर्मिती करणे.
- संगीत अकादमी सुरु करणे.




ॲड. बाबासाहेब नानल, गुरुकुल


ल.ग. पटवर्धन प्राथमिक विद्यामंदिर


रा. भा. शिर्के प्रशाला, ज्युनियर कॉलेज


रंजनमंदिर


**मा. ना. श्री. श्रीपादजी नाईक**
केंद्रीय राज्यमंत्री पर्यटन व बंदरे, अध्यक्ष, र.ए. सोसायटी, रत्नागिरी.

**श्री. सतीश शेवडे**
कार्यवाह, र.ए. सोसायटी, रत्नागिरी.

**ॲड. विजय साखळकर**
उपकार्याध्यक्ष, र.ए. सोसायटी, रत्नागिरी.
अध्यक्ष, शालेय समिती शिर्के प्रशाला.

**श्रीमती शिल्पाताई पटवर्धन**
कार्याध्यक्षा, र.ए. सोसायटी, रत्नागिरी.

**श्री. श्रीकांत दुदगीकर**
सहकार्यवाह, र.ए. सोसायटी, रत्नागिरी.

**श्री. मनोज पाटणकर**
अध्यक्ष, शालेय समिती,
रा.भा. शिर्के प्रशाला, कनिष्ठ महाविद्यालय, रत्नागिरी.

**श्री. रमेश चव्हाण**
मुख्याध्यापक, रा.भा. शिर्के प्रशाला, रत्नागिरी.



**आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी आयकर क्रमांक सवलत (80G) उपलब्ध आहे.**


E-mail : rb_shirkehighschool@rediffmail.com | Website : www.rbshirkehighschool.com
संपर्क : 9404470622 / 9403845134


॥ तेजस्विनावधीतमस्तु ॥
**रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीची,**

# रा. भा. शिर्के प्रशाला, रत्नागिरी.


कै. श्रीम. मालतीबाई जोशी


कै. श्री. बाबुराव जोशी


कै. श्री. अरुअप्पा जोशी


कै. श्री. रा. भा. शिर्के

कै.ज.वा. तथा बाबुराव जोशी हे एक द्रष्टे व्यक्तिमत्व आणि त्यांच्या सहचारिणी कै. मालतीबाई जोशी या दाम्पत्याने १९३३ मध्ये रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. संपूर्ण महाराष्ट्रातील एक अग्रगण्य आणि कार्यक्षम अशी ख्याती असणाऱ्या संस्थेचे बीजारोपण १९२५ मध्ये मुलींच्या एका लहान शाळेपासून झाले. आजपर्यंतच्या वाटचालीत संस्थेने शिक्षण क्षेत्रात अनेक मूलभूत आणि रचनात्मक विकास घडवून आणला आहे. आज र.ए. सोसायटी, रत्नागिरीच्या छत्रछायेखाली २२ पेक्षा अधिक शाळा, महाविद्यालये, प्रशिक्षण आणि व्यवसायाभिमुख संस्था काम करत आहेत. यामधील एक रा.भा. शिर्के प्रशाला आज सर्वच क्षेत्रात उंच भरारी घेत जनमानसात वेगळा ठसा उमटवत असल्याचे आपण अनुभवत आहोत. ज्ञानरूपी सुवर्णमय प्रकाश सर्वदूर पोहोचविणे हे आपले लक्ष्य उराशी बाळगून संस्था कार्यरत आहे. विद्यार्थ्यांना माफक खर्चात सर्वोत्तम शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी संस्था कटिबद्ध आहे.



## प्रशालेबद्दल थोडे काही...

रत्नागिरीच्या शैक्षणिक वाटचालीत आपले नाव अधोरेखित करणाऱ्या रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीची रा.भा. शिर्के प्रशाला ही कोकणातीलच नव्हे, तर महाराष्ट्रातील एक अग्रगण्य व नामांकित शाळा म्हणून ओळखली जाते. अमृत महोत्सवात पदार्पण करणाऱ्या या प्रशालेच्या प्रांगणात बालवर्गापासून बारावीपर्यंत सुमारे ३२०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

सन १९४८ साली संस्थेचे संस्थापक कै. बाबुराव जोशी यांनी दूरदृष्टीने ट्युटोरियल स्कूल चालविण्यासाठी आपल्या ताब्यात घेतले. त्यावेळी कै. रामदास भाऊसाहेब शिर्के यांनी उदारहस्ते दिलेल्या देणगीतून ट्युटोरियल स्कूलचे नामकरण रा. भा. शिर्के प्रशाला असे करण्यात आले. आज प्रशालेने सर्वच क्षेत्रात उंच भरारी घेत जनमानसात वेगळा ठसा उमटवल्याचे आपण अनुभवत आहोत. याचे सर्व श्रेय संस्थेचे आजवरचे सर्व सन्माननीय संस्थापक, पदाधिकारी, प्रशालेचे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, जागरूक पालक वर्ग आणि प्रशालेचे गुणवंत विद्यार्थी या सर्वांना आहे.

शालेय उपक्रमांबरोबरच शालाबाह्य स्पर्धा परीक्षांमध्ये **(शिष्यवृत्ती, एन.एम.एम.एस., गणित प्रज्ञाशोध, शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षा)** सातत्याने मिळणाऱ्या घवघवीत यशाची तसेच दहावी बोर्डाच्या परीक्षेत १००% निकालाची परंपरा शाळेने जपली आहे. क्रीडा क्षेत्रात शाळेचा कायम दबदबा असतो. शाळेचे प्रशस्त क्रीडांगण अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडू घडवत आहे. दिल्ली येथे होणाऱ्या आर.डी. परेडसाठी सलग दोन वर्षे महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्याचे भाग्य प्रशालेला लाभले आहे.

तसेच शासनामार्फत प्रशालेला अटल टिंकरींग लॅब मंजूर झाली आहे. या लॅबमधील विविध वस्तूंचा उपयोग करून रोबोट बनविणे, थ्रीडी प्रिंटर चालवणे, लॅपटॉपच्या आधारे प्रोग्राम बनविणे या सुविधांमुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळत आहे.

'ही आवडते मज मनापासूनी शाळा । लाविते लळा ही जसा माऊली बाळा ।।' असा अनुभव देणारी आमची कै. ल.ग. पटवर्धन प्राथमिक विद्यामंदिर, रत्नागिरी ही शाळा जून १९९५ मध्ये सुरू झाली. संस्थेचे तत्कालीन कार्याध्यक्ष कै. अरुअप्पा जोशी यांनी शिक्षण क्षेत्रातील भविष्याचा वेध घेऊन हे विद्यामंदिर सुरू केले. आज या शाळेने आपल्या प्रगतीचा आलेख सतत उंचावत ठेवला आहे.

गुरुकुल प्रकल्प हे प्रशालेचे अजून एक वैशिष्ट्यपूर्ण पाऊल. पंचकोशाधारित सर्वांगीण शिक्षण देणे हा या प्रकल्पाचा हेतू आहे. आंतरराष्ट्रीय संशोधन, वैद्यकीय, अभियांत्रिकी तसेच कला, क्रीडा व सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रात कार्य करणारे उत्तम, गुणवंत विद्यार्थी शाळा घडवत आहे. अनेक विद्यार्थी देश-विदेशात उच्च पदावर काम करत आहेत. ही गौरवास्पद बाब आहे. या सर्व गुणवान विद्यार्थ्यांचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.

र. ए. सोसायटी संचलित, रा. भा. शिर्के प्रशाला कनिष्ठ महाविद्यालयाची स्थापना १४ जुलै २०१६ रोजी झाली. कनिष्ठ महाविद्यालयात विज्ञान आणि वाणिज्य शाखा सुरू आहेत. येथे विद्यार्थ्यांच्या गुणात्मक विकासाबरोबरच सर्वांगीण विकासावर भर दिला जातो. E-learning सुविधा, स्पर्धा परीक्षा तसेच करिअर मार्गदर्शनाची जोड दिली जाते. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी 'क्षितिज : beyond you' या वार्षिक कला, क्रीडा महोत्सवाचे आयोजन केले जाते. सक्षम विद्यार्थी घडविणे हेच आमचे ध्येय आहे. कनिष्ठ महाविद्यालयाला १००% निकालाची परंपरा आहे. अनुभवी व तज्ज्ञ प्राध्यापक वर्ग असल्याने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीकडे वैयक्तिक लक्ष दिले जाते.

१९४८ साली लावलेल्या या रोपट्याचे आता वटवृक्षात रूपांतर झाले आहे. आता तंत्रज्ञान युगाकडे वाटचाल करत असताना, बदलत्या काळाला सामोरे जाण्यासाठी आणि अजूनही विविधांगाने शाळेला सुसज्ज व समृद्ध करण्यासाठी आपले मार्गदर्शन व सहकार्य अपेक्षित आहे.

## प्रशालेच्या उल्लेखनीय बाबी :

- अटल टिंकरींग लॅब
- संगणक कक्ष
- शिष्यवृत्ती
- एन.एम.एम.एस.
- गणित प्रज्ञाशोध
- शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षा
- BDS, MTS परीक्षेत उत्तुंग यश
- जानकी पुरस्कार
- राणी लक्ष्मीबाई पुरस्कार
- पंतप्रधान ढाल (स्काऊटस् गाईड्स)
- शिव छत्रपती क्रीडा पुरस्कार
- कला, क्रीडा, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात जिल्हा, राज्य व आंतरराष्ट्रीय स्तरावर यश
- महाराष्ट्र शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक वर्ग

रा.भा. शिर्के प्रशाला स्थापना सन १९४८

ल.ग.पटवर्धन विद्यामंदिर, स्थापना सन १९९५

र.ए. सोसायटीची स्थापना सन १९३३

ॲड. बाबासाहेब नानल गुरुकुल, स्थापना सन २००५

रा.भा. शिर्के ज्युनि.कॉलेज स्थापना सन २०१६

**आमचा रा. भा. शिर्के प्रशाला परिवार**